# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी - ५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम.आ.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली -४४२६०५ E-Mail : college.section@unigug.ac.in

जा. क्र./ गों. वि. /म. वि. वि. वि. ८९८/२०२३ दि. २७ /०६/२०२३

# परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र राज्यातील अनुदानित उच्च महाविद्यालयातील सुरु असलेल्या २०८८ प्राध्यापक पदांच्या दिव्यांग आरक्षणाची व १८ जुलै २०१८ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाची (युजीसी) प्रकाशित भारताच्या राजपत्रातील नियम क्र. ५.१ (a) vi मधील तरतुदीची अंमलबजावणी करणेबाबत.**

**संदर्भ :- :- महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/२०२३/दिव्यांग आरक्षण/म. वि.-१/६२३५ दिनांक १६ मे २०२३**

विद्यापीठाशी संलंग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), पुणे यांच्या कार्यालयाकडुन महाराष्ट्र राज्यातील अनुदानित उच्च महाविद्यालयातील सुरु असलेल्या २०८८ प्राध्यापक पदांच्या दिव्यांग आरक्षणाची व १८ जुलै २०१८ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाची (युजीसी) प्रकाशित भारताच्या राजपत्रातील नियम क्र. ५.१ (a) vi मधील तरतुदीची अंमलबजावणी करणेबाबतचे पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्र अवलोकन करुन महाविद्यालय स्तरावर उचित कार्यवाहीच्या अनुषंगाने संलग्नित करण्यात येत आहे. महाविद्यालयाने, महाविद्यालयात रिक्त असलेल्या पदांची भरती प्रकिया राबवित असतांना दिनांक १८ जुलै २०१८ रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १८/०७/२०१८ च्या अधिसुचनेतील नियम क्र. ५.१ (a) vi मधील तरतुदीची अंमलबजावणी करावी.

तसेच संदर्भीय पत्रामध्ये नमुद केल्यानुसार दिव्यांग आरक्षण धोरणाच्या अमंलबजावणीबाबत कार्यवाही घेऊन त्याचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

मा. प्र- कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार

27/6/23

(देवेंद्र एम झाडे)
उपकुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

मा.अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
सर्व संलंग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलीपी :-

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

विषय: महाराष्ट्र राज्यातील अनुदानित उच्च महाविद्यालयांमधील सुरू असलेल्या २०८८ प्राध्यापक पदांच्या दिव्यांग आरक्षणाची व १८ जुलै २०१८ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे (युजीसी) प्रकाशीत भारताच्या राजपत्रातील नियम क्र. ५.१ (a) vi मधील तरतुदीची अंमलबजावणी करणेबाबत.

संदर्भ -१. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२३/ प्र.क्र. २२८/ मशि-५ दिनांक २.०५.२०२३
२. दिव्यांगाचे अधिकार अधिनियम २०१६, दिनांक २८ डिसेंबर,२०१६
३. विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दिनांक १८ जुलै २०१८
४.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय (शुध्दीपत्रक) क्र. Misc-२०१८/C.R.५६/१८/ UNI-१ दिनांक- १० मे, २०१९
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. दिव्यांग २०१८/ प्र.क्र. ११४/ १६अ दिनांक- २९ मे, २०१९
६. मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. दिकआ/ प्र-संघटना-प्र-७/ प्राध्यापक संघ/ अहमदनगर/ २०२२-२३ दि. ०३.०३.२०२३

उपरोक्त विषयी संदर्भांकीत शासन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागाच्या अधिकारकक्षेतील अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील दि. १.१०.२०१७ च्या विद्यार्थीसंख्येवर आधारीत शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या आकृतीबंधास शासन निर्णय क्र. आढावा-१५१३/ प्र.क्र. १२५/ मशि-५ दि. ३.११.२०१८ अन्वये अंतरिम मान्यता देण्यात आलेली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने उक्त महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या भरतीस काही नियम व अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त शासन निर्णय दि. ३.११.२०१८ ची अंमलबजावणी करण्यास्तव विहीत करण्यात आलेल्या पध्दतीनूसार सदर पदे भरण्यासाठी शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असून त्यानुसार संबंधित प्रत्येक संस्था/ महाविद्यालयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. याच कार्यवाहीचा एक

भाग म्हणजे संस्था/ महाविद्यालयाची बिंदूनामावली तयार करुन ती संबंधित विद्यापीठातील मागास कक्षाकडून प्रमाणीत करुन घेणे होय. पदभरती करताना शासनाच्या आरक्षण धोरण अंमलबजावणीबाबत वारंवार शासनस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत. पदभरतीबाबत श निर्णय दि. ३.११.२०१८ च्या शासन निर्णयापुर्वी पासून आरक्षण धोरणाचे नियम ठरविण्यात आलेले अ संस्था/ महाविद्यालयांकडून सदर धोरणाचा पाठपुरावा करण्यात येत असल्याचे दिसून येते.

सदर पदभरतीमध्ये मागासवर्गीय कक्षाच्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याबरो केंद्र शासनाच्या कायदा व न्याय विभागाचे राजपत्र दि. २८ डिसेंबर २०१६ रोजी प्रकाशित दिव्यां अधिकार कायदा २०१६ तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दि. १८ जुलै २०१८ म नियमांचे तसेच संदर्भांकीत शासन निर्णयांचे पालन होणे अत्यावश्यक आहे. त्यानुसार सं महाविद्यालयांनी दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही क अनिवार्य आहे. तथापी सदर नियमांची अंमलबजावणी होत नसल्याची बाब समोर आली असल दिव्यांग आरक्षण धोरणाची अचूक व परिणामकारक अंमलबजावणी करण्याबाबत योग्य ती कार्यव करण्याची आपल्या स्तरावर दक्षता घेण्यात यावी.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १८ जुलै २०१८ रोजीच्या भारताच्या राजपत्र मार्गदर्शक सुचना प्रकाशित केलेल्या आहेत. या राजपत्रातील कलम क्र. ५.१(a) vi तसेच उच्च व त शिक्षण विभाग, शासन निर्णय (शुध्दीपत्रक) क्र. Misc- २०१८/C.R.५६/१८/ UNI-१ दिनांक- १० मे, २०१ मधील तरतुदीनुसार देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापक निवडीसा संगठीत करण्यात येणाऱ्या निवड समितीतील सदस्यांत जर अनुसुचित जाती/ जमाती/ ओबीसी अल्पसंख्यांक/ महिला/ विविध- अपंग यापैकी कोणत्याही प्रवर्गातील उमेदवार अर्जदार असल्यास, त्य प्रवर्गातील प्रतिनिधीत्व करणारा शिक्षणतज्ञ कुलगुरूंनी प्रतिनिधी म्हणून नामनिर्देशित केले पाहिजेत. य नियमान्वये दिव्यांग उमेदवार जर अर्जदार असेल तर दिव्यांग प्रतिनिधी निवड समितीत मा. कुलगुरूंनी नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. या तरतूदीनुसार मा. कुलगुरूंनी आवश्यक ती कार्यवाही करावी तसेच दिव्यांग आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन तात्काळ देण्यात याव्यात.

सोबत- वरीलप्रमाणे.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत -१.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे.
३.सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)

२/- दिव्यांग आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित विद्यापीठांकडून कार्यवाही केली जाईल याबाबत विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण यांनी दक्षता घ्यावी.